मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, 401 101.

25 वर्षे विकासाची 25 "माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र.मनपा/आस्था/1506/2026-27 दि. 04/11/2026

प्रति,
सिनीअर जॅनालिस्ट,
इ टेंडरींग विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- भारताची जनगणना 2027 करीता मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील संपूर्ण लोकसंख्या गणना करण्याच्या कामकाजाकरीता 08 तांत्रिक सहाय्यक पुरवठा करणेकामी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

भारताची जनगणना 2027 करीता मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील संपूर्ण लोकसंख्या गणना करण्याच्या कामकाजाकरीता 08 तांत्रिक सहाय्यक पुरवठा करणेकामी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(प्रणाली घोंगे)
उप-आयुक्त(मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- निविदा सुचना

Scanned with OKEN Scanner

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, 401 101.

25 वर्षे विकासाची

जा.क्र.मनपा/आस्था/ 1506 /2026-27 दि. 04 /11/2026

|| TENDER NOTICE ||

Mira-Bhayandar Municipal Corporation is inviting e-tenders from interested contractors through registered contractors/registered agencies for for carrying out the work of complete population enumeration in Mira Bhayandar Municipal Corporation area for the Census of India 2027 by providing 08 Technical Assistants. The tender forms will be available on the Mira-Bhayandar Municipal Corporation e-tendering website http://www.mahatenders.gov.in from 05 /11 /2026 to 23/ 11 /2026 until 3:00 PM. The completed tender forms must be submitted on the same website by 23/ 11 /2026 until 4:00 PM. Interested contractors/registered agencies must pay the tender form fee and EMD through the online receipt system; otherwise, the tender will not be considered valid. The technical envelope of the tender, No. 01, will be opened on 26 /11 /2026 at 4:00 PM at Mira-Bhayandar Municipal Corporation, Head Office, Establishment Department, 3rd Floor, Bhayandar (W).

The Commissioner of Mira-Bhayandar Municipal Corporation reserves the final right to accept or reject any kind of online tender.

Interested service providers shall quote their Service Charges/Administrative Charges over and above the fixed amount prescribed for the Technical Assistants.

Sr.no	Name of Work	Tender Form Fee	Earnest Money Deposit (EMD) (Rs.)
1.	Providing 08 Technical Assistants for carrying out the complete population enumeration work within the jurisdiction of Mira Bhayandar Municipal Corporation for the Census of India 2027, for a period of **08 months or as per the actual requirement of the Corporation.**	Rs. 10,000 + 1800 (GST 18%) = 11,800/-	रु.16,000/- (In Words - Sixteen Thousand Only)

Note :- 1) Tender form should be submitted through Online system in two envelopes.
2) Tender form fee is non-refundable.
3) Hon. Commissioner of Mira Bhaindar Municipal Corporation has reserved right to reject any or all bids, without assigning any reasons.
4) The period of validity of tender is 120 days.

(Pranali Ghonge)
Deputy Commissioner (HQ)
Mira Bhaindar Municipal Corporation

(Hon. Commissioner approval)

Scanned with OKEN Scanner

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, 401 101.

जा.क्र.मनपा/आस्था/ 1506 /2026-27 दि. 04 /11/2026

|| जाहीर निविदा सूचना ||

भारताची जनगणना 2027 करीता मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील संपूर्ण लोकसंख्या गणना करण्याच्या कामकाजाकरीता 08 तांत्रिक सहाय्यक नोंदणीकृत कंत्राटदार/नोदणीकृत संस्थेमार्फत इच्छुक ठेकेदार यांचेकडून ई-टेंडरिंग पध्दतीने निविदा मागविणेत येत आहे. सदर निविदा फॉर्म दि. 05 /11/2026 ते दि. 23 /11/2026 रोजी दु.3.00 वाजेपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ई-टेंडरिंग संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध होतील. सदर निविदा पत्रक/निविदा फॉर्म दि. 23 /11/2026 रोजी सायं 4.00 वाजेपर्यंत याच संकेतस्थळावर सादर करावयाचे आहेत. इच्छुक कंत्राटदार/नोंदणीकृत संस्था यांनी निविदा पत्रक/निविदा फॉर्म फी व निविदा बयाणा रक्कम ऑनलाईन रिसिप्ट सिस्टीमद्वारे भरणा करावी. अन्यथा दरपत्रके/निविदा ग्राह्य समजण्यात येणार नाही. निविदेचा तांत्रिक लिफाफा क्र.01 दि. 26 /11/2026 रोजी सायं 4.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे उघडण्यात येईल.

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी कोणत्याही प्रकारच्या ऑनलाईन निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबत अंतिम अधिकार राखुन ठेवला आहे.

इच्छुक पुरवठादारांनी तांत्रिक सहाय्यक यांना निश्चित केलेल्या रक्कमेवर सर्विस चार्ज/प्रशासकीय चार्ज नमुद करावेत.

अ.क्र.	कामाचे नाव	कोऱ्या निविदा पत्रकाची किंमत	निविदा बयाणा रक्कम
1.	भारताची जनगणना 2027 करीता मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील संपूर्ण लोकसंख्या गणना करण्याच्या कामकाजाकरीता 08 तांत्रिक सहाय्यक पुरवठा करणे (08 महिने किंवा आवश्यतेनुसार)	रु.10000 + (GST 18%) 1800= रु.11800	रु.16,000/- (अक्षरी रु. सोळा हजार मात्र)

टिप :-
1) निविदा दोन लिफाफा पद्धतीने ऑनलाईन सादर कराव्यात.
2) फॉर्म फि परत केली जाणार नाही.
3) आलेल्या निविदा मधील कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा सर्वच निविदा नाकारण्याचाअधिकार आयुक्तांनी राखून ठेवलेला आहे. त्याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.
4) निविदा विधी ग्राह्यता कालावधी 120 दिवसांचा असेल.

(प्रणाली घोंगे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

Scanned with OKEN Scanner

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, 401 101.

निविदा पत्रकाविषयी नियम व अटीशर्ती सन 2026-27

1) निविदा पत्रक संबंधीची सविस्तर माहितीच्या छायांकीत प्रती शासकीय शुल्क आकारुन आस्थापना विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे मिळेल.
2) निविदा पत्रक किंमत (receipt online system) ऑनलाईन सिस्टीमद्वारे भरण्यात यावी. चेकने रक्कम स्विकारली जाणार नाही. तसेच निविदा पोस्टाने पाठविली किंवा स्विकारली जाणार नाही.
3) निविदेसाठी EMD Receipt online system ऑनलाईन सिस्टीमद्वारे स्विकारण्यात येईल. चेकने किंवा रोख रक्कम स्विकारली जाणार नाही.
4) सदर कामी करारनामा तयार करुन मुंबई मुद्रांक अधिनियम 1998 या कायद्या अंतर्गत सदर करारनाम्यावर अपेक्षित मुद्रांक शुल्क भरुन कायदेशीर कारवाई आपल्यामार्फत करण्यात यावी.
5) निविदा बयाणा/सुरक्षा अनामत वर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब आकार दिले जाणार नाही.
6) निविदा ऑनलाईन केल्यानंतर सदर निविदा सिलबंद करुन आस्थापना विभाग मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, भाईंदर (प.) येथे 72 तासांच्या आत Hard Copy सादर करणे अनिवार्य राहिल. तथापि निविदेची छाननी ऑनलाईन प्राप्त कागदपत्रे (ENV-1) याचेनुसारच केली जाईल याची नोंद घ्यावी. Hard Copy मधील कागदपत्रे (ENV-1) हे निविदेमध्ये स्पष्टीकरण आवश्यक असल्यास उघडण्यात येतील. ऑनलाईन व ऑफलाईन कागदपत्रामध्ये तफावत असल्यास ऑनलाईन सादर केलेली कागदपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.
7) करारनामा करणेपूर्वी निविदाधारकाने ठेक्याच्या वार्षिक महसुल रक्कमेच्या अंदाजाइतके 3% प्रमाणे रु.48,000/- (अक्षरी रक्कम रु.अठ्ठेचाळीस हजार मात्र) इतकी राष्ट्रीयकृत बॅकेची बॅक गॅरेंटी देणे बंधनकारक राहिल. तसेच मासिक देयकामध्ये शासनाच्या नियमानुसार 2% आयकर कपात करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
8) निविदाधारकाने नेटवरुन डाऊनलोड केलेल्या निविदा पत्रकातच दर भरुन शासनाच्या अधिकृत वेबसाईट http://www.mahatender.gov.in वर सादर केले पाहिजेत.
9) निविदाधारकाने त्यांचे नाव, संपूर्ण पत्ता व संपर्क दुरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती देणे आवश्यक आहे.
10) भविष्यात महानगरपालिकेच्या विविध विभागातून विविध पदांसाठी कर्मचाऱ्यांची मागणी आसल्यास मा.स्थायी समिती/मा.प्रशासक यांचे मान्यतेने कर्मचारी मुदतीत पुरवठा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

11) निविदाधारकाने निविदा पत्रात मनुष्यबळ सेवा पुरविण्याचे दर (सेवा व वस्तु कर वगळुन) यांची माहिती विहित केलेल्या नमुन्यात रकान्यात स्पष्ट अक्षरात अंकी व अक्षरी लिहिणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारची खाडाखोड करु नये.

12) निविदा सादर करताना दोन लिफाफा पद्धतीने खालीलप्रमाणे कराव्यात.

लिफाफा क्र.1 मध्ये (Envelope No.1) खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावीत.

1. Tender fees form should be submitted.
2. EMD receipt should be submitted.
3. वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate)
4. पॅनकार्डची प्रत (कंपनी / भागीदारी संस्था निविदा भरत असेल तर संबंधित कंपनी/भागीदारी संस्था यांच्या नावाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक आहे. प्रोप्रायटरी फर्म्सचे पॅनकार्ड प्रोप्रायटरच्या नावाचे असावे.)
5. निविदाधारकांचे (Bidder) कंपनी/भागीदारी संस्था/प्रोपायटरी फर्म्सचे संबंधित सस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र.
6. निविदाकाराची मागील 3 वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल कामाच्या किंमतीच्या किमान 50% असावी. याबाबत उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate) Chartered Accountant (सनदी लेखापाल) यांनी प्रमाणित केलेले असावे.
7. निविदाकाराने मागील 3 वर्षात शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये 50% पुरवठा केलेले समतुल्य काम केलेले असणे आवश्यक आहे.
   (अनुभवासाठी निविदाकाराने प्रत्यक्ष काम केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. कार्यादेश चालणार नाही.)
8. व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (PT)
9. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र (EPF)
10. कर्मचारी राज्य विमा निगम चे प्रमाणपत्र (ESIC)
11. निविदाकाराने कार्यादेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत कंत्राटी कामगार कायद्यांतर्गत कामगार परवाना सादर करण्यात येईल असे प्रतिज्ञापत्र.
12. निविदाकाराला गेल्या 5 वर्षामध्ये शासकीय/निमशासकीय संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था/ महामंडळाने काळ्या यादीत टाकलेले नाही याबाबतचे निविदाकाराच्या लेटर हेडवरील हमीपत्र.
13. निविदाकाराने निविदेसोबत सादर केलेल्या दस्ताऐवजांची सत्यता दर्शविणारे रु.500/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र.

वर नमुद केलेली तांत्रिक माहिती व त्याबाबतच्या मुळ प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती निविदा उघडताना सादर केली नसेल, तर निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

ब) लिफाफा क्र.2 मध्ये

1. निविदा पत्रक दरसूची सादर करणे.
2. निविदा दरसूची संकेतस्थळावर online उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यामध्ये दर भरावेत.
3. संस्था/कंपनी यांनी ई-निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन त्यापैकी वरील (अ) च्या लिफाफ्यात तांत्रिक बाबींचा व (ब) चे लिफाफ्यात वित्तीय बाबींची सही शिक्क्यासह कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावीत.

Scanned with OKEN Scanner

4. महानगरपालिका निश्चित करील अशा तारखेला व वेळेवर निविदा उघडण्यात येईल. त्या दिवशी निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल. ते गैरहजर असले तरी निविदा उघडण्यात येतील. निविदा उघडताना प्रथम लिफाफा क्र.1 उघडण्यात येईल. लिफाफा क्र.1 मधील कागदपत्रे परिपूर्ण असल्यानंतरच लिफाफा क्र.2 उघडण्यात यईल. अन्यथा अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.
5. सदरचे काम हे महानगरपालिकेस करुन दिलेल्या करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार कार्यादेशामध्ये नमुद केलेल्या विभागात व दिलेल्या मुदतीत पुर्ण करुन द्यावयाचे आहे.
6. कोणतीही निविदा पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचे, तसेच कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.
7. मंजूर निविदाधारकाकडून नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत, आयकर व अन्य कर व शासनाचे वेळोवेळी लावण्यात येणारे कर देयकातून कापून घेण्यात येतील.
8. ठेकेदाराने पुरवठा केलेल्या ठेका कर्मचाऱ्यांना प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत स्वत: वेतन अदा करावे. ठेका कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यामध्ये वेतन अदा केल्याबाबतचे NEFT/RTGS/Cheque याबाबतचा तपशिल वेतन बिलाच्या देयकासोबत जोडून देणे आवश्यक आहे. तद्नंतरच महानगरपालिकेकडून ठेकेदाराला मासिक देयक अदा केले जाईल.
9. निविदाधारकाने खालील शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या ठेका तांत्रिक सहाय्यक पुरवठा करणे बंधनकारक राहील.

अ.क्र.	पदनाम	शैक्षणिक अर्हता	वयोमर्यादा
1.	भारताची जनगणना 2027 करीता - तांत्रिक सहाय्यक	मान्यताप्राप्त विद्यापिठाची अभियांत्रिकी शाखेची माहिती तंत्रज्ञानातील विज्ञान पदवी	किमान 18 वर्ष व कमाल 38 वर्ष

10. ठेकेदार व कर्मचारी यांचेमध्ये कोणताही तंटा/वाद निर्माण झाल्यास महानगरपालिका हस्तक्षेप करणार नाही.
11. कंत्राटदाराने ठेका कामगाराला निश्चित केलेले वेतनानुसार आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी रक्कम कंत्राटी कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे विवरणपत्र (Statement) आणि वेतन देयक (ज्यावर संबंधीत कंत्राटी कामगाराचा धनादेश क्रमांक/ई.सी.एस क्रमांक/एन.ई.एफ.टी क्रमांक लिहिलेला असेल), कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयात 1) मस्टर नोंद 2) वेतन रजिस्टर नोंद 3) बँकेतील वेतन प्रदानाचा तपशिल (Details) सादर करावेत. कंत्राटदाराने ठेका कर्मचाऱ्यांना प्रथम वेतन व भत्ते प्रदान केल्यानंतरच त्याबाबतचे देयक Reimbursement स्वरुपात अदा करणेत येईल.
12. कंत्राटी कामगाराच्या रजेच्या दिवशी दुसरा कामगार/कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.
13. महापालिकेतील विविध विभागाअंतर्गत तसेच महापालिका सांगेल अशी Co-related अशी सर्व कामे पुरवठा केलेल्या कर्मचाऱ्यांना करावी लागतील. तसे न केल्यास निविदाधारकावर 07 दिवसाची लेखी नोटीस देऊन दंडात्मक कारवाई करुन तसेच सुरक्षा अनामत बँक गॅरंटी जप्त करुन निविदा रद्द करण्यात येईल.
14. पुरविण्यात आलेल्या ठेका/कंत्राटी कर्मचारी यांचा नियमित आस्थापनेशी काहीही संबंध असणार नाही. तसेच महापालिका सेवेत सामावुन घेण्याचे हक्क ठेकेदारास/ठेका कर्मचाऱ्यास असणार नाही.
15. कामामध्ये कोणत्याही कारणाने व्यत्यय आणल्यास विभागप्रमुखाच्या आदेशानुसार दिवसाप्रमाणे दंड रु.500/- आकारला जाईल.

Scanned with OKEN Scanner

16. सर्वसाधारण कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाज करावे लागेल. आवश्यकता असल्यास सार्वजनिक व साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी देखील सोपविलेले कामकाज करावे लागेल. प्रत्यक्ष सेवा पुरविण्यासाठी पुरविल्या जाणाऱ्या व्यक्तींची माहिती ठेकेदाराने आगाऊ द्यावी, तदनुसार कामाच्या वेळा प्रशासकीय सोईसाठी स्वतंत्रपणे आयुक्त यांचेमार्फत ठरविता येऊ शकतील. परंतु ठेकेदाराने भरावयाचे दर हे संपुर्ण कामाचे असतील, कामाच्या तासाप्रमाणे नसतील.
17. याकामी लेखापरीक्षणत काही आक्षेप आल्यास त्यांची योग्य पुर्तता करण्याची जबाबदारी मंजूर कंत्राटदारावर राहील.
18. दरमहा कामाचे देयक, विभाग निहाय काम केल्याबाबतचे विभागप्रमुखाचे शिफारशीसह सादर करावे लागेल.
19. निष्काळजीपणा, अज्ञात, सहेतुक कार्यवाही अथवा अन्य ठेकेदाराशी/सेवा पुरविणाऱ्या व्यक्तीशी संबंधीत कारणाने महापालिका मालमत्तेची हानी झाल्यास किंवा अन्य दोष राहील्यास, कोणताही बोजा निर्माण झाल्यास उपलब्ध अभिलेखेनुसार होणारी नुकसान भरपाई संबंधीत ठेकेदार, व्यक्ती संस्थाकडुन, देयकातुन/अनामत/सुरक्षा अनामत रक्कमामधुन वा कायदेशिर मार्गाने वसुल केले जाईल. प्रसंगानुरुप अन्य कायदेशिर कार्यवाहीस संबंधीत ठेकेदार व त्यांचेकडील सेवा पुरवणाऱ्या व्यक्ती पात्र ठरतील.
20. ठेकेदारांनी त्यांनी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना वेतन देण्याची सर्व जबाबदारी ठेकेदारावर राहील.
21. मुदतीच्या आत अभिकर्त्याचा ठेका मुदतीपुर्व रद्द करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला असुन, यासाठी 15 दिवसाची पुर्वसुचना देण्यात येईल.
22. प्रचलित शासकीय नियम पाळणे, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी निविदाकारांवर राहील. तसेच वरील कामी आवश्यक ते सर्व परवाने निविदाकारांने संबंधित कार्यालयाकडून घेणे बंधनकारक राहील.
23. महानगरपालिकेच्या आदेशाची अंमलबजावणी करावी लागेल. महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने सर्व नियमाचे पालन करावे लागेल. महापालिकेच्या हितविरुध्द कार्यवाही करता येणार नाही. कार्यालयीन कामाकाजात गोपनीयता राखावी लागेल. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहील.
24. सदरची निविदा मिळण्याकरीता अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्याचे कोणत्याही क्षणी आढळल्यास निविदाधारक/यशस्वी निविदाधारक यांची निविदा रद्द करण्यात येईल व सदर निविदाधारक यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.
25. निविदाधाराची निविदा नामंजूर झाल्यास त्यांच्या EMD परत मिळण्यासाठी अर्ज केल्यास परत करणेची कार्यवाही करणेत येईल. सदर EMD वर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही.
26. निविदा मंजूर ठेकेदार यांनी महानगरपालिकेबरोबर ठरवून दिलेल्या कामाचा करारनामा नियमानुसार स्टॅम्प पेपरवर त्वरित करुन द्यावा. तद्नंतर कार्यादेश देण्यात येईल. करारनाम्यातील अटी व शर्ती संबंधितावर बंधनकारक राहतील.
27. कंत्राटी कर्मचाऱ्यांना कार्यालयात हजर होताना व कार्यालय सोडताना बायोमॅट्रीक प्रणालीवर त्यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी बायोमॅट्रीक प्रणाली बसविणे बंधनकारक असेल. बायोमॅट्रीक प्रणालीचा खर्च कंत्राटदाराला उचलावा लागेल. सदरच्या नोंदी वेळोवेळी कार्यालय प्रमुखास दाखविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.
28. नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहिन्याच्या 10 तारखेपर्यंत देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. सदर महिन्याचे मागणी देयक बिल दर महिन्याच्या 10 तारखेनंतर Bank statement, Salary Slip, PT चलनासह विभागास सादर करावे.
29. निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदेतील नियम व अटी मान्य असल्याबद्दल त्यावर शिक्यासह सही केली पाहिजे. जर सही केली नसेल तर अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

Scanned with OKEN Scanner

30. मंजूर निविदाधारकाने कनिष्ठ अभियंता (ठेका) यांची नियुक्ती करणे अगोदर त्यांच्या शैक्षणिक कागदपत्रे नस्ती आस्थापना विभागात दोन प्रतीत छायाचित्रासह जमा करणे बंधनकारक राहील.
31. ठेकेदाराकडून पुरवठा करण्यात आलेल्या ठेका कर्मचा-यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र पोलिसांकडून प्राप्त करुन घेऊन 01 महिन्याच्या आत सादर करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
32. ठेकेदाराकडून ठेका पुरवठा केलेल्या कर्मचा-यांचे स्वतंत्र बँक खाते उघडण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
33. कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यास दिलेल्या पारिश्रमिकाच्या/इतर भत्त्यांच्या धनादेशाची छायांकित प्रत दरमहा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला/पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही. EPF वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
34. कंत्राटदारास/पुरवठादारास बिलाची रक्कम अदा करताना शासकीय नियमानुसार 2% आयकर कपात करुन उर्वरीत देयक रक्कम अदा केली जाईल.
35. व्यवसाय कर (PT) भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांचे राहील.
36. पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे/पुरवठादाराचे एकुण दरावरुन न्युनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतील.
37. प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत.
38. कंत्राटदाराकडून/पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम देय राहणार नाही जमा केलेल्या सुरक्षा ठेवीची अनामत रक्कम जप्त केली जाईल.
39. कंत्राटी कर्मचारी वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहील्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही.
40. कंत्राटी कर्मचारी रजेवर असल्यास पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील.
41. कायम स्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे/शासनाकडे/न्यायालाकडे दावा अथवा खटला करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होताना ठेकेदाराने ठेका कर्मचाऱ्यांकडून सादर करणे बंधनकारक राहिल.

(प्रणाली घोंगे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

Scanned with OKEN Scanner